अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २४७ ■ सोमवार दि.२६ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 247 ■ Monday Dt.26 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## चौसाळा परिसरातुन पुन्हा शेतकऱ्यांची मोटर चोरीला

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनुर पोलीस स्टेशन हद्दीतील चौसाळा परिसरात सध्या चोरीचे प्रमाण वाढले असुन चोरटयानी शेतकऱ्यांकडे आपला मोर्चा वळवल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शेतकऱ्यांच्या विहीरीवरील केबलची चोरीच्या घटनेबरोबरच आता जेबापिंप्री येथिल नांदुर रोड लगत असलेल्या तुकाराम जोगदंड यांच्या शेतातून बोरची मोटर ७.५र्क एसीयन कंपनीची अज्ञात लोकांनी चोरून घेऊन गेले असुन या मोटरची किंमत २५००० हजार रुपये इतकी असुन याबाबत तुकाराम जोगदंड यांनी चौसाळा पोलीस चोकीला या मोटर चोरीबाबत तक्रार दिली आहे.

चौसाळा परिसरात शेतकऱ्यांचे विहीरीवरील केबल किंवा मोटर चोरीला जाण्याच्या घटना मोठया प्रमाणावर वाढल्या असुन अशा अनेक घटनाचा तपास प्रलंबित असल्यामुळे चोराचे धाडस वाढले असल्याचे पाहायला मिळत आहे. सदरील घटनेचा तात्काळ तपास करण्यात यावा अशी मागणी शेतकरी वर्गातुन करण्यात येत आहे.

## जिल्हा आरोग्य विभागाचा एकही वैद्यकीय अधिकारी पीएम करण्यासाठी स्पॉटवर गेले नाही? शेवटी बीड ग्रामीण पोलिसांनी रुग्णवाहिकेतून मृतदेह जिल्हा रुग्णालयात आणला!

# आमदारांच्या गावात मृत अवस्थेत सापडलेला मृतदेह शेवटी पोलिसांनीच सिव्हिलमध्ये आणला, आमदारांच्या गावातच त्या मृतदेहाची विटंबना?

### वैद्यकीय अधिकाऱ्यांना माहिती देऊनही कोणीच शवविच्छेदन करण्यासाठी आले नाही; स्थानिकच्या आरोग्य अधिकाऱ्यांची उडवाउडवीची उत्तरे?

- जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनाही याचे काहीच गांभीर्य वाटले नाही, मग असे डीएचओ काय कामाचे?
- वैद्यकीय अधिकाऱ्यांसह जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई करायला हवी?

बीड । प्रतिनिधी

नवगण राजुरी शिवारात आढळलेल्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यासाठी स्पॉटवर एकही डॉक्टर न आल्याने शेवटी ग्रामीण पोलीसांनी मृतदेह ॲम्बुलन्स मधुन जिल्हा रूग्णालयात आणला, शवविच्छेदन केले आणि मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. दरम्यान बीड ग्रामीण पोलीस काल सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत घटनास्थळी होते, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी माहिती देवूनही कोणीच शवविच्छेदन करण्यासाठी आले नाही. स्थानिकच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनाही याचे काहीच गांभीर्य वाटले नाही, मग असे डीएचओ काय कामाचे ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. तसेच हा मृतदेह आमदारांच्या





गावातच सापडला असून, मृत्यूनंतरही त्या मृतदेहाची विटंबना आमदारांच्या गावातच झाली आहे. याबाबत आमदार महोदय काय भूमिका घेणार याकडे विशेष लक्ष लागले आहे.

बीड तालुक्यातील नवगण राजुरी शिवारात वाघदरवाडी डोंगराच्या कडेला एका लिंबाच्या झाडाखाली बलभिम सोनबा खेत्रे (वय ७५ रा. बोराटे वस्ती ता. जामखेड) हे काल सायंकाळी मृत अवस्थेत आढळून आले होते. बीड ग्रामीण पोलीसांनी याची माहिती स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी देऊन मृतदेह कुजलेला असल्याने त्याचे जागीच शवविच्छेदन (पीएम) करणे आवश्यक असल्याचे कळविले मात्र त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. काल रात्री उशिरापर्यंत एकही डॉक्टर पीएम करण्यासाठी स्पॉटवर न गेल्याने शेवटी बीड ग्रामीण पोलीसांनी रूग्णवाहिकेतून मृतदेह जिल्हा रूग्णालयात आणला आणि शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. बीड ग्रामीणचे एपीआय दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोह. सचिन साळवे, पो.ना.विजय जाधव व त्यांच्या सहकार्यांनी ही सर्व प्रक्रिया पुर्ण केली.

दरम्यान जिल्हा आरोग्य विभागाचा एकही वैद्यकीय अधिकारी घटनास्थळी पीएमसाठी गेला नाही. विशेष म्हणजे ग्रामीण पोलीसांनी याची माहिती संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिली, मृतदेह कुजलेला असल्याने घटनास्थळी त्याचे शवविच्छेदन आवश्यक होते. मात्र एकही डॉक्टर त्याठिकाणी गेला नाही. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनीही एखादा पर्यायी वैद्यकीय अधिकारी त्या ठिकाणी पाठवला नाही. मृत्यूनंतरही त्या मृतदेहाची विटंबना आरोग्य विभागाने केली असून अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांसह जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांवरही कलेक्टर साहेबांनी कारवाई करायला हवी.





## मस्साजोग येथील नदी पाण्याने खचाखच भरली

बीड । प्रतिनिधी

नाम फाउंडेशन मार्फत मोफत मशीन आणि मोफत डिझेल देऊन येथील जवळपास तीन किलोमीटर अंतरावरील नदीमध्ये खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात आले. मे महिन्यात आलेल्या अवकाळी पावसाने ही नदी खचाखच भरली असून परिसरातील गावातील शेतकऱ्यांनी नामचे कौतुक केले आहे. आज जनआंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी या साठलेल्या पाण्याची पाहणी केली.

**नामच्या मोफत कामाचे कौतुक**

सलग तीन किलोमीटर पाणी साठणार असल्याने आता या गावातील शेतकऱ्यांना फार मोठी ऊर्जा मिळाली आहे. शेतकऱ्यांना दोन पिके बिनधास्त घेता येतील आणि प्रत्येक वर्षी या पाण्याचा फायदा घेता येईल. दोन दिवसात झालेल्या पावसाने अनेकांच्या विहिरीत पाणी आले असून अनेकांची बंद पडलेले पाण्याचे बोअर देखील चालू झाले आहेत, असेही ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

नदीत साठलेले पाणी पाहण्यासाठी शेतकऱ्यांचा ओढा वाढला असून एक वेगळा आनंद परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे.

पान २ वर

## अवैध रेतीची वाहतूक सिरसदेवी परिसरात थांबता थांबेना

### महसूल विभाग, पोलीस प्रशासन झोपेत

सिरसदेवी । प्रतिनिधी

सध्या गेवराई तालुक्यातील सिरसदेवी परिसरात खुलेआम दिवसा ढवळ्या अवैध रेतीची वाहतूक सुरु असून याकडे महसूल विभागाचे आणि पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी अनेक वृतपत्रात अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाळू माफिया विरोधात बातम्या प्रसारित होऊनही महसूल विभागाकडून किंवा पोलीस प्रशासनाकडून कसलीच कारवाई वाळूमाफियावर होत नसल्याने महसूल आणि पोलीस प्रशासन झोपेत असल्याचे दिसत आहे.

तालुक्यात आता दिवस-रात्र खुलेआम होत असलेल्या रेती तस्करीला महसूल विभागाने खुली सूट दिल्याचे दिसत आहे. तसेच तालुक्यात अहोरात्र वाळू तस्करांचा धुमाकूळ सुरूच असल्याचे दिसत आहे मात्र तहसील प्रशासन आणि पोलीस झोपेचे सोंग घेत असल्याने रेती वाहतूक सिरसदेवी परिसरात आणि गेवराई तालुक्यात भरदिवसा ट्रॅक्टर, ट्रक व टिप्परने अवैध वाहतूक करत आहेत. तालुक्यात मोठया प्रमाणावर गोदावरी नदी पात्रातून अहोरात्र रेती उपसा नदीपात्रातून होत आहे. रेतीघाटांचे लिलाव झालेले नसतानाही नदीपात्र पोखरून मोठ्या प्रमाणात रेती चोरी करून अवैध वाहतूक होत आहे. त्यामुळे शासकीय कर्मचारी या वाळू चोरांच्या वेसणीला बांधलेले आहेत, असा निष्कर्ष नागरिक तालुक्यात व परिसरात काढत आहेत.

संपूर्ण गेवराई तालुक्यासह सिरसदेवी परिसरात मोठ्या प्रमाणात ट्रक व टिप्परने अवैध वाळू वाहतूक सुरू आहे. सिरसदेवी परिसरात सध्या मोठमोठे

पान २ वर



## युनिकॉर्न आयशर च्या शोरुममध्ये फसवणूक

बीड । प्रतिनिधी

बीड येथील शहरातील बार्शी रोडवरील युनिकॉर्न मोटर्स नावाने आयशरचे शोरूम मध्ये वेगळाच प्रकार आढळून आला. दुरुस्तीसाठी आलेल्या एका आयशरचा एसीओ बॉक्स बदलून जुना बॉक्स टाकल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी आयशर टेम्पो मालकाच्या तक्रारीवरून येथील मॅनेजर आणि स्टोअर किपरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे मात्र अधिकृत शोरुम मध्ये असे प्रकार घडत असतील तर विश्वास ठेवायचा कोणावर असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शहरातील बार्शी नाका येथे बार्शी रोडवर युनिकॉर्न मोटर्स नावाने आयशर कंपनीचे अधिकृत शोरुम आहे. येथे नवीन व जुन्या आयशर कंपनीचे विविध वाहने दुरुस्ती व सर्व्हिसिंग साठी येतात. पण येथे वेगळेच प्रकार घडत असल्याचे दिसून येत आहे. येथे दुरुस्तीसाठी एम.एच. २३ ए यू ६५६७ क्रमांकाचा आयशर टेम्पो आला होता. दुरुस्तीसाठी आलेला टेम्पो येथे ठेवण्यात आला. यावेळी युनिकॉर्न मोटर्सचा मॅनेजर आणि स्टोअर किपर दुरुस्तीसाठी आलेला टेम्पोचा एसीओ बॉक्स बदलला गेला असून हा मुळ ओरिजनल बॉक्स नाही असा आक्षेप टेम्पो मालकाने घेतला, पण त्याचे काहीच ऐकून घेण्यास शोरुम चालक ऐकून घेण्यास तयार नव्हते. पण टेम्पो मालकाने चक्क शोरुमच्या छताच्या लोखंडी पोल वर चढून गळफास घेण्याचा इशारा दिला त्यानंतर याची माहिती पेठ बीड पोलिसांना मिळाली. पेठ बीड पोलीस ठाणे निरीक्षक अशोक मोदीराज यांनी शोरूमकडे धाव घेऊन टेम्पो मालकाला खाली उतरून त्याचे म्हणणे ऐकून घेऊन कारवाई केली.यांनी या टेम्पोचा ओरिजनल २०२४ चा एसीओ बॉक्स बदलून त्या जागी दुसरा जुना वापरलेला एसीओ बॉक्सवरील सालाची खाडाखोड करुन २०२० चा बसवून संगणमत करुन फिर्यादीचा विश्वासघात करुन फसवणूक केली. या अशयाची फिर्याद टेम्पो मालक अशोक रावन शेळके रा. वांगी यांनी दिली. त्यावरून पेठ बीड पोलीस ठाण्यात आरोपी आशीम शेख (मॅनेजर), शारुख शेख (स्टोअर किपर) या दोघांवर कलम ४०६ नुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस हवालदार माने हे करीत आहेत.

# युवासेना पदाधिकारी यांना खरच वाटल्या का स्कॉर्पिओ गाड्या

## का तरुण आणी नेता खुश होण्यासाठी नुसत्याच लाडया-गोड्या

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या राजकीय पटलावर एकनाथजी शिंदे साहेब यांच्या रूपाने एक मुस्तदी, कणखर, आणी जनसामान्य नागरिकांमधून आलेले नेते लाभले आहेत. एकनाथजी शिंदे साहेब यांनी शिवसेना पक्षाचे महाराष्ट्र राज्यातील तळागळातील नागरिकांच्या प्रश्नावर आवाज उठवून जनसामान्यांची सेना म्हणजे एकनाथराव शिंदे यांची शिवसेना असा विश्वास संपादन करत आपली वाटचाल सुरूच ठेवली आहे. तर दुसरीकडे युवासेने मधे कार्य सुद्धा महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात सरस असेच आहे. युवा सेनेच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यातील तरुण वर्ग जोडला गेला असून एकनाथजी शिंदे आणी श्रीकांत शिंदे यांच्यावर विश्वास ठेवत शिवसेना आणी युवासेनेला कार्यकर्ते जोडले जात असतांनाच बीड जिल्ह्यात परवा भव्य तिरंगा रॅली निमित्त महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट उपस्थित होते.

तिरंगा रॅली साठी उपस्थित असतांना मात्र बीड मध्ये अजबच प्रकार बघायला मिळाला. आणी तो अजब प्रकार म्हणजे युवा सेनेच्या आणी विशेष:तहा बाजीराव चव्हाण यांच्या चार निष्ठावंत युवासेना पदाधिकारी यांना स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देण्यात आल्या आणी त्या सुद्धा सामाजिक न्याय मंत्री संजयजी सिरसाट साहेब यांच्या हस्ते, दुसरी गोष्ट ही कि आपलेच हात आणी आपलीच पाठ थोपटून घेण्याचा प्रकार युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्याकडून करण्यात आलेला दिसून आला.



कारण महाराष्ट्र राज्यात जशी युवकांच्या हृदयात युवा सेना आहे तशी ती बीड जिल्ह्यातील तरुणांच्या हृदयात देखील आहे. परंतु ही युवा सेना तरुणांच्या हृदयात पोहचवनारे खरे शिलेदार हे दुसरेच आहेत हे संपूर्ण जिल्ह्याला माहिती आहे. मात्र बीड जिल्ह्यात युवा सेना पोहोचवण्याचे काम फक्त मीच केले अशी पाठ बाजीराव चव्हाण स्वत:च थोपटून घेत आहेत अशी चर्चा बीड जिल्ह्यातील जनता यानिमित्ताने करत आहे.

माझे बीड जिल्ह्यात शेकडो निष्ठावंत पदाधिकारी आहेत असे दाखवून देण्याचा केविलवाणा प्रयत्न परवाच्या स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देण्याच्या प्रकारात कळून चुकला. युवा सेना वाढवणारे खरे शिलेदार वेगळेच मात्र माझ्या मुळेच युवा सेना जिल्ह्यात वाढली, पोहचली, युवा सेनेचा विस्तार झाला, आणी हे सगळं माझ्या मूळे आणी माझ्या या निष्ठावंता मुळेच शक्य झाले त्यामुळे माझ्या या अमुक तमुक निष्ठावंतांना वरिष्ठाच्या हस्ते स्कॉपीओ गिफ्ट दिल्या अशी सुंदर जाहिरातबाजी दिसून आली आणी माझ्या सोबत किंवा माझ्या मागे राहा म्हणजे मि तुम्हाला गाड्या गिफ्ट देऊ शकतो असे आमिष नकळत युवकांना बाजीराव चव्हाण यांच्याकडून देण्यात आल्याचे नागरिकां मधून बोलले जाऊ लागले आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात असे शेकडो युवा सेनेचे निष्ठावंत पदाधिकारी आहेत, मग बाजीराव चव्हाण हे या सर्वांना स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देणार आहेत काय? परवाच्या या अजब प्रकारा मूळे बीड जिल्ह्यातील नागरिक म्हणू लागले आहेत कि... ज्या पदाधिकारी यांना गाड्या खरच वाटल्या ते युवासेना पदाधिकारी आहेत का? फक्त तरुण आणी नेता खुश होण्यासाठी नुसत्याच लाडया-गोड्या आहेत, असा आरोप युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा संपूण मराठवाडा निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी प्रसिद्ध पत्रका द्वारे केला आहे.

# विपुल पिंगळेचं पोट दुखण्याचे कारण काय? : धनंजय पापा सोळंके यांचा सवाल

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यामध्ये शून्यातून विश्व निर्माण करणारे बीड जिल्ह्यातील एकनाथ शिंदे यांचे अत्यंत विश्वासू समजले जाणारे बाजीराव चव्हाण यांच्यावरती जळफळात करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यातच आता बीडच्या काही नासक्या कांद्यांकडून बाजीराव दादा चव्हाण यांची बदनामी करण्याचे रचलेले आहे पण आम्ही शिवसैनिक म्हणून बाजीराव दादा चव्हाण यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. युवा सेनेच्या वतीने ज्यांना ज्यांना खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब व युवासेना कार्याध्यक्ष पूर्वीची सरनाईक साहेब यांच्या माध्यमातून मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा यांनी स्कॉर्पिओ गाड्या दिले आहेत ते मुळात शिवसैनिक आहेत. यामध्ये विपुल पिंगळे यांचे पोट दुखण्याचे काही कारण नाही. आणि मुळात मुद्दा हा आहे की ते विरोधी पार्टीचे असले असते तर समजून घेतलं असतं परंतु हा भाग मला कळला नाही.

# प्रा.अर्चना जोशी राज्यस्तरीय आदर्श हिन्दी शिक्षक पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय हिंदी अध्यापक संघाद्वारे दोन दिवसीय हिंदी अधिवेशन आणि आदर्श पुरस्कार वितरण नेवासा त्रिमूर्ती महाविद्यालय येथे झाले त्यात योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातील हिंदी विषयाच्या अध्यापिका प्रा.अर्चना जोशी यांना राज्यस्तरीय आदर्श हिंदी शिक्षक पुरस्कार पदवीधर मतदार संघाचे आ.डॉ.सतीश तांबे यांच्या हस्ते व राज्याध्यक्ष डॉ.मिलिंद कांबळे, राज्यसचिव रेवन्नाथ कर्डिले, राज्य कार्याध्यक्ष राजकुमार कांबळे आदींच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

प्रा.अर्चना जोशी यांना यापूर्वी राज्यस्तरीय कन्यारत्न पुरस्कार, राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार, जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, विभागस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार हे मिळालेले आहेत. स्वत: साठी, विद्यार्थ्यांसाठी वैचारिक लेखन केले आहे. हिंदी भाषिक राज्य व हिंदी अकादमी 'तर्फे घेण्यात येणाऱ्या हिन्दी काव्य स्पर्धेत प्रा.जोशी यांना सतत पाच वेळेस प्रथम क्रमांक मिळालेला आहे विनोदी काव्य लेखनात उत्कृष्ट विनोदी काव्य म्हणून त्यांच्या काव्याचा सन्मान झाला आहे. महिला दिनानिमित्त राज्यस्तरीय तू सबल झंझावात या काव्यास प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे. त्यांचे भावस्पर्शी कविता संग्रह चैतन्यमयी सुविचार संग्रह सादगी हिंदी काव्यसंग्रह, बारा प्राथमिक काव्यसंग्रह, कथासंग्रह, चारोळी संग्रह यात जोशी यांचा सहभाग आहे कबीरांच्या दोनशे दोह्यांच त्यांनी विश्लेषण केले आहे.

अनेक महाविद्यालयीन परिषदांच्या पुस्तकात तसेच वर्तमानपत्रात त्यांचे विविध लेख प्रकाशित झालेले आहेत. त्यात 'डिजिटल पालकत्व' मोहर।' फेसबुक मैत्री 'संत कबीर', 'मोकळा संवाद 'शिक्षकाची सही एकदम सही' असे विविध सामाजिक विषयावर त्यांचे लेख प्रकाशित आहेत. आपण विचार कसा करावा याचाही माणसाने विचार करावा या संकल्पनेतून सुदृढ विचार संग्रहाचे लेखन त्यांनी खास विद्यार्थ्यासाठी तर साहित्य संपदा मुंबईतर्फे खास विद्यार्थ्यांच्या पौष्टिक डब्यासाठी 'खाऊचा डबा 'हे पुस्तक तसेच पाऊस हा काव्यसंग्रह लवकरच प्रकाशित होत असून आम्ही साहित्यिक ह्या महाराष्ट्र राज्याच्या मोठ्या समूहात काव्य, मिश्किल चारोळी लेखन शंभर डिजिटल पोस्ट प्रकाशित झाले आहेत. या शैक्षणिक वर्षात सुदृढ विचार संग्रह प्रकाशित होईल.

विद्यार्थ्यांना मदत करणे त्यांच्या समस्या जाणून घेणे त्याच्यावर पर्याय शोधणे हे कार्य गेल्या १९ वर्षापासून त्या करीत आहेत. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रा.अर्चना जोशी यांचे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सी.एल.बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर, संचालक एम.एस.लोमटे इतर सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. पी.आर.थारकर, उपप्राचार्य डॉ.जे.ए.देशपांडे, पर्यवेक्षक प्रा.जळगावकर, प्राध्यापक, इतर स्नेहीजन यांनी अभिनंदन केले आहे.

पान १ वरून...

## अवैध रेतीची वाहतूक सिरसदेवी परिसरात...

बांधकाम सुरू आहे. या बांधकामाला नियमितपणे रेतीचा पुरवठा आहे. कित्येक गरिबांचे घरकुल रेतीअभावी रखडले आहेत. धनदांडग्यांना हवी तेव्हा रेती मिळत असून आणि गरिबांना मात्र वंचित राहावे लागत आहे. शासनाने घरकुलांसाठी ५ ब्रास रेती रॉयल्टी मोफत देणार असल्याची घोषणा केली होती. परंतु घरकुल धारकांना वाळू माफिया कडून चाळीस हजार रुपयांना एक टिप्पर घ्यावे लागत आहे. गरिबांच्या घरकुलासाठी फुकटची तर दूरच, विकतची सुद्धा रेती ५ ब्रास रेतीसाठी तब्बल ४० हजार रुपये मोजावे लागत असल्याचे भयावह चित्र सिरसदेवी परिसरात आहे.

गडी कडून आणि तलवाडा रोडने दररोज रात्री व दिवसा ट्रक व टिप्परने अवैध रेती वाहतूक होते. त्यावेळी महसूल विभाग झोपलेला असतो व जागा राहणारा पोलिस विभाग चोरांवरची नजर सोडून रेतीवर खिळवून ठेवतो आर्थिक नजराणा मिळाला की, तुमचे तुम्ही चालू द्या असा प्रकार सध्या सिरसदेवी परिसरात खुलेआम सुरू आहे. महसूलच्या आणि पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने सिरसदेवी परिसरात वाळू माफिया गब्बर होताना दिसत आहेत. त्यांना छुपा आशीर्वाद देणारे महसूल व पोलिस प्रशासन स्वत:ला मालामाल करून घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.


## मस्साजोग येथील नदी पाण्याने खचाखच भरली

त्यामुळे नाम फाउंडेशनच्या कामाचे अनेक जण कौतुक करत आहेत. या गावातून जाणारी नदी खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम गेल्या दीड महिन्यापूर्वी नामने हाती घेतले होते. आणखी काही दिवस काम चालले असते. परंतु दररोज पडत असलेल्या पावसामुळे मशीन चांगल्या पद्धतीने काम करू शकत नव्हती. त्यामुळे आणि ठरल्याप्रमाणे सर्व काम पूर्ण झाल्यामुळे नामच्या कामाला यश आले आहे. या कामावर ॲड. अजित देशमुख यांनी सातत्याने लक्ष दिले. आणि काम चांगले व्हावे यासाठी प्रयत्न केले.

पाणी अडवण्यासाठी नदीचे रुंदीकरण शक्य तेवढे मोठ्या प्रमाणात करण्यात आले असून खोलीकरणात देखील काही ठिकाणी पंधरा फूट पाणी साठले आहे. आणखी पाणी साठण्याची मोठी क्षमता त्या ठिकाणी आहे. त्यामुळे पाणीसाठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला आहे. या पाहणीच्या वेळी भागवत कदम, तुषार देशमुख, मंगेश देशमुख, मोरे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# भोगलवाडी जिल्हा परिषद गटात चेहरा नवा, फक्त समाधान चांदणे चीच हवा

किल्ले धारूर । प्रतिनिधी



जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचे वारे वाहू लागले असून आता निवडणुकीचा मार्ग मोकळा झाल्यामुळे गावागावात राजकारणाची चर्चा सुरू आहे. भोगलवाडी जिल्हा परिषद गट हा बीड जिल्ह्यातील मातब्बर नेत्याचा गट मानला जातो.परंतु सद्य परिस्थिती पाहता व राजकीय उलथा पालत पाहता या भोगलवाडी जिल्हा परिषद गटामध्ये नवीन चेहऱ्याला संधी मिळू शकते आणि येथील मतदार वर्ग हा नवीन चेहऱ्याच्या शोधात असून समाधान चांदणे यांच्या रूपाने युवकांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे.

समाधान चांदणे हे अनेक वर्षापासून सामाजिक कार्य करत असून ते कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधिल नाहीत. सतत समाजसेवेचा ध्यास घेतलेले समाधान हे सर्वसामान्य लोकांमध्ये आपुलकीचे वाटतात कुठलीही समस्या असो त्या समस्येला मदत करण्यासाठी समाधान चांदणे हे कधीही तत्पर असतात. त्यांच्याकडे ना कधी राजकारण ना कधी जात न धर्म त्यामुळे समाधान चांदणे हे भोगलवाडी या जिल्हा परिषद गटामध्ये चर्चेमध्ये आहेत. अनेक महिन्यापासून स्थगित असणाऱ्या निवडणुका होणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे आणि समाधान चांदणे यांना जिल्हा परिषदेमध्ये पाठवून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी व भोगलवाडी मतदार संघावर प्रस्थापितांचे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी समाधान चांदणे हे योग्य उमेदवार असल्याने आज भोगलवाडी जिल्हा परिषद मतदार संघामध्ये गावागावात चर्चा सुरू आहे. येणाऱ्या काळात एक प्रामाणिक, निपक्ष व धडाडीचा तरुण कार्यकर्ता या गटाचे प्रतिनिधित्व करणार असल्याने भेगलवाडी जिल्हा परिषद गटामध्ये समाधान चांदणे यांची हवा आत्तापासूनच सुरू झाली आहे.

# सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची संगिताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी भेट



बीड । प्रतिनिधी

आज बीडच्या दौऱ्यावर आलेले सामाजिक न्याय मंत्री मा.ना.श्री.संजयजी शिरसाट यांनी संगिताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

दि.६ रोजी अहिल्यानगर - पुणे महामार्गावर झालेल्या अपघातात जखमी झालेल्या शिवसेनेच्या मराठवाडा संपर्कप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य अँड. संगीताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी सामाजिक न्याय मंत्री मा.ना.श्री.संजयजी शिरसाट यांनी भेट घेऊन तब्येतीविषयी विचारपूस केली. अपघातामध्ये जखमी झालेल्या शिवसेना उपजिल्हाप्रमुख शेख फर्जाना, विशाल गणोरकर यांच्या दुखापतीची माहिती यावेळी मंत्री महोदयांनी आत्मीयतेने घेतली.

या भेटीच्यावेळी शिवसेनेचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर हे उपस्थित होते.



वीट भट्टीवर भेट करून सदरील कामावरील महिलेला तिची समस्या समजून घेतली व तेथील वित भट्टी वरील कामगारांची जनजागृती करण्यात आली. त्यांना काही समस्या असतील तर महिला हेल्पलाईन ला कॉल करण्यास सांगून सखी केंद्र येथे तुम्ही येऊ शकता. त्यानं सखी केंद्रच पत्ता व माहिती हे हसत ओतर्क देण्यात आले.

# भारतीय बौद्ध महासभा आष्टी तालुक्याच्या वतीने सहावी बौद्ध धम्म परिषद उत्साहात संपन्न



बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ आक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी बौद्ध धम्म स्विकारून त्यांच्या लाखो अनुयायांना धम्म देत धम्मसूर्य पुन्हा भारताच्या क्षितिजवार आणला हे मोठे धम्मचक्र परिवर्तन म्हणून ओळखले जाते, तेव्हा बाबासाहेबांनी एक प्रतिज्ञा केली होती. कीमी सारा भारत बौद्धमय करीन पण अवघ्या दीड महिन्यातच बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले, पण बाबासाहेबांनी दिलेला धम्म गावा-गावात माणसा - माणसापर्यंत नेण्याचे काम बाबासाहेबांनी स्थापन केलेली भारतीय बौद्ध महासभा सध्या करत आहे, बौद्ध महासभा आष्टी तालुका कार्यकारणीच्या वतीने धम्मकार्य अधिक गतिमान व्हावे या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे होत असलेल्या दि.१६ ते २४ दरम्यान श्रामनेर शिबिर, समता सैनिक दल शिबिर, महिला धम्म प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले होते त्याचा समारोपाचा म्हणजेच धम्म परिषदेचा कार्यक्रम दि.२५ रोजी आष्टी येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पूज्य भन्ते पटीसेन, राज्य अध्यक्ष यू. जी. बोराडे, महाराष्ट्र कार्यालयीन सचिव बापूसाहेब निकाळजे, राज्य संघटक डी एस नरशिंगे, संरक्षण सचिव अमरसिंह ढाका, जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे, केंद्रीय शिक्षक ॲड. दिलीप निकाळजे, जिल्हा संस्कार उपाध्यक्ष वामन निकाळजे, केंद्रीय शिक्षिका सुरेखाताई भालेराव, बीड तालुका अध्यक्ष राजेंद्र ससाने, गौतम खेमाडे सर उपस्थित होते, सर्वप्रथम भीम नगर येथील बुद्ध विहारापासून कार्यक्रम स्थळी धम्म रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवराच्या हस्ते पूजन करून सुरुवात करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीरंग पवार सर यांनी केले. त्यानंतर श्रामणेर भंते जीवक, भन्ते उपाली, भन्ते अश्वदीप व भन्ते यश यांनी आपले मनोगत व्यक्त केले. काही महिला शिबिरार्थींनी आपले अनुभवपर भाषण केले, त्यानंतर प्रमुख मान्यवरांनी आपली धम्मदेशना पर भाषणे केली.

या कार्यक्रमाला ॲड. वाल्मीक निकाळजे, ॲड. रत्नदीप निकाळजे, पत्रकार किरण जावळे, नगरसेवक अरुण निकाळजे, मा. नगरसेवक दीपक निकाळजे, वंदना गायकवाड, दगडू खंडागळे, किशोर निकाळजे, भिवा बुचडे, संतोष कांबळे बसपा, निसर्गन सर, जालिंदर गायकवाड, दीपाताई सदाफुले, सुनील साळवे, रोकडे सर, विजय काळे, बौद्धाचार्य दिनकर निकाळजे, भीमराव ससाने, सुनील खंडागळे, धामणगाव, नांदा बेलगाव, पोखरी ब्रह्मगाव, कऱ्हेवडगाव, डोईठाण, डोंगरगण आदी गावचे महिला व बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. धम्म परिषद यशस्वी करण्यासाठी युवराज निकाळजे, किशोर निकाळजे, बाळासाहेब शिंदे, बबन शिंदे, अशोक सटवाजी निकाळजे, देविदास निकाळजे, भास्कर काळे, अविनाश निकाळजे, सुभाष निकाळजे, प्रकाश निकाळजे, कपिल निकाळजे, बाळासाहेब शिंदे व तालुका कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणाल निकाळजे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन संतोष ससाने यांनी केले.

## राज्यात वादळ-पाऊस आणि उष्णतेचा रेड अलर्ट

# वेळेच्या ८ दिवस आधीच मान्सून केरळमध्ये पोहोचला

मुंबई । प्रतिनिधी



केरळमध्ये मान्सून दाखल झाला आहे. तो १ जून या त्याच्या नियोजित वेळेच्या ८ दिवस आधी केरळमध्ये पोहोचला आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, १६ वर्षांत पहिल्यांदाच मान्सून इतक्या लवकर पोहोचला आहे. २०२४ मध्ये तो ३० मे रोजी केरळमध्ये पोहोचला. तो देशापासून सुमारे ४०-५० किलोमीटर अंतरावर चार दिवस अडकला होता आणि शुक्रवारी संध्याकाळी पुढे सरकला. आजच तो तामिळनाडू आणि कर्नाटकच्या अनेक भागात पोहोचण्याची अपेक्षा आहे. त्याच वेळी, तो एका आठवड्यात देशाच्या दक्षिण आणि ईशान्य राज्यांना व्यापू शकतो. तो ४ जूनपर्यंत मध्य आणि पूर्व भारतात पोहोचेल.

याशिवाय, विभागाने आजसाठी दोन प्रकारचे रेड अलर्ट जारी केले आहेत. पहिला मुसळधार पावसाचा आणि दुसरा अति उष्णतेचा. गुजरात, गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळच्या किनारी भागात २०० मिमी पर्यंत पाऊस पडू शकतो. पुढील सात दिवस या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच, आज देशातील एकूण २९ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात, गेल्या तीन दिवसांत वादळ-पावसाशी संबंधित घटनांमध्ये मृतांचा आकडा ६० वर पोहोचला आहे.

त्याच वेळी, राजस्थानच्या पश्चिम भागात २७ मे पर्यंत उष्ण वाऱ्यांमुळे रेड अलर्ट आहे. शुक्रवारी जैसलमेरमध्ये कमाल तापमान ४८ अंश होते. आज ते आणखी वाढू शकते. २७ मेपर्यंत समुद्रात जाण्यास बंदी हवामान खात्याने केरळच्या किनारी आणि अंतर्गत भागात वादळाचा इशारा जारी केला आहे. मच्छिमारांसह सामान्य लोकांना खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीपच्या किनाऱ्यावर २७ मे पर्यंत मासेमारीसाठी समुद्रात जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. राज्यात यावेळी नौतपादरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने पुढील सात दिवस वादळ आणि पावसाचा इशारा जारी केला आहे. याचे कारण राज्यातील चक्रवाती अभिसरण आणि ट्रफ ॲक्टिव्हिटी आहे. आज भोपाळ, इंदूर, ग्वाल्हेर, जबलपूर, उज्जैनसह एकूण ४७ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# प्रवाशांच्या सोयीसाठी ठेवलेले सिमेंटचे बाकडे तोडले

## शिवाजीनगर पोलिसांचे साफ दुर्लक्ष : एस.एम.युसूफ



बीड । प्रतिनिधी

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे समोर प्रवाशांना बसण्यासाठी ठेवण्यात आलेल्या सिमेंटच्या तीन बाकड्यांपैकी एक तोडल्याचे दिसून आले आहे. मात्र याकडे शिवाजीनगर पोलीस ठाणे कर्मचाऱ्यांचे साफ दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसदी पत्रकात नमूद केले आहे की, समाजात असे काही लोक असतात जे परोपकारी विचाराने समाजासाठी, लोकांसाठी काहीतरी करतात. मात्र अशा लोकांनी लोकांसाठी केलेल्या कार्याचे महत्त्वच समाजाला किंवा लोकांना असल्याचे दिसून येत नाही. म्हणूनच की काय बार्शी रोडवरील शिवाजीनगर पोलीस ठाणे समोर असलेल्या बस थांब्यावर बसची वाट पहात मोठ्या संख्येने उभे राहणाऱ्या प्रवाशांसाठी सिमेंटचे तीन बाकडे ठेवण्यात आले होते. यापैकी सिमेंटचे एक बाकडे तोडून टाकलेल्या अवस्थेत दिसून आले आहे. हे पाहता उर्वरित दोन सिमेंटच्या बाकड्यांसोबत सुद्धा कधी काय घडेल हे सांगता येत नाही. आता त्या तुटलेल्या बाकड्यावर पाय देऊन काही टारगट मुले शिवाजीनगर पोलीस ठाणे च्या संरक्षक भिंतीवर बसून मोबाईल बघण्यात व्यस्त झालेले दिसून येतात. हे पाहता अशाच मुलांनी बसण्याच्या बाकड्यावर उड्या मारून तर ते तोडले नसावे ना असा प्रश्न उपस्थित होत आहे. म्हणून लोकांनी लोकांसाठी करावं तरी काय? लोकांना काहीच समजत नाय. प्रवाशांच्या सोयीसाठी ठेवलेले सिमेंट चे बाकडे तोडून टाकले हाय. असे म्हणण्याशिवाय गत्यंतर नाही. तर याकडे शिवाजीनगर पोलिसांचेही साफ दुर्लक्ष असल्याचे यामुळे दिसून आले आहे.

यामुळेच येथे एका बाकड्याची तोडफोड करून नासधूस करण्यात आली आहे. हे कमी होते की काय तरुण मुले-मुली या बाकड्यांवर पाय ठेवून शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या संरक्षक भिंतीवर बसून मोबाईल पाहण्याचा उद्योग करत असताना पोलीस कर्मचारी त्यांना साधे हटकत सुद्धा नाहीत. अशा हलगर्जीपणामुळेच उरफाट्या टाळक्यांचे फावते आणि त्यांच्याकडून इतरांना त्रास होईल असे उद्योग केले जाते मात्र शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पोलिसांना याचे कुठलेही सोयरसुतक नसल्याचे दिसून येते. असेही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.



# श्री. विनायकराव माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

बीड । प्रतिनिधी

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. श्री विनायकराव माध्यमिक विद्यालय, वैध्यकिन्ही ता.पाटोदा जि. बीड या शाळेने नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळवले असून शाळेचा निकाल १००% टक्के लागलेला असून विद्यालयातून २९ विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत. कु.जोगदंड सुजाता बबन ९३.४०% गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे. चिरंजीव. बांगर विशाल त्रिंबक ९३% टक्के गुण घेऊन दुतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. चिरंजीव बावणे पार्थ मधुकर ९२.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती पात्र कु.श्रेया चौरे व कु. प्रेरणा चौरे यांचाही शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गुणगौरव करण्यात आला.

याशिवाय कुमारी बावणे अंकिता सिताराम ९२%, कु. बाबर साक्षी सखाराम ९०% अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून सदरील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ प्रसंगी वैद्यकिन्हीचे सरपंच अतुलजी मकाळ, सोनेगाव येथील इंजिनियर संभाजी चौरे, संस्था सचिव भागवत (अण्णा) आजबे, संस्था अध्यक्ष बाजीराव (अण्णा) बांगर, संस्था उपाध्यक्ष बाबासाहेब भाऊ शिंदे, संचालक नारायण भाऊ वाघमारे व मधुकर बापू जगताप उपस्थित होते. सरपंच साहेबांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम जिद्द, चिकाटी आणि आई-वडिलाच्या कष्टाची, परिस्थितीची जाणीव ठेवून सातत्याने अभ्यास केल्यास शब्बासकीची थाप नक्कीच मिळते या स्वरूपाचे मार्गदर्शन केले.

इंजिनीयर संभाजी चौरे साहेब यांनी मार्गदर्शन करताना करताना ग्रामीण भागातील विद्यार्थी कठोर परिश्रम करणारे असतात हे अनेक स्पर्धा परीक्षेच्या निकालातून दिसून आले असे म्हटले, दहावी नंतर पॉलिटेक्निकच्या माध्यमातून इंजीनियरिंग कडे येता येते व आपले करिअर उत्तम प्रकारे घडू शकते. याबाबत सखोल मार्गदर्शन केले मुख्याध्यापक बांगर सर, मकाळ सर, कोचाळे सर, आजबे सर, वळे सर, जिरेकर सर, मोरे सर, श्रीमती.क्वडे मॅडम, शिक्षकेतर कर्मचारी आजी माजी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी प्रस्ताविक आजबे सर यांनी तर सूत्रसंचालन बांगर सर यांनी शेवटी मोरे सर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.



मा.ना. पंकजाताई गोपीनाथजी मुंडे यांच्या सोबत रामटेक बंगला मुंबई येथे द्वारकाधीश भवन धोंडीपुरा बीड.

# पत्रकारांना धमकी देणाऱ्या आ.बाबुराव कदमांवर गुन्हा दाखल करा : जिल्हाध्यक्ष अशोक होळकर

**अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने जाहीर निषेध**

बीड / प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील पत्रकार संजय सुर्यवंशी यांना बातमी का छापली म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याचे धमकी देणाऱ्या आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक होळकर यांनी केली आहे, पत्रकारांवर दबाव टाकून आवाज दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या आमदाराचा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ बीड शाखेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे.



दैनिक देशोन्नती तालुका प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष यांना दिनांक २२ मे २०२५ रोजी निवधा तळणी सर्कल मधील २५ गावे २५ तासांपासून अंधारात या मथळ्या खाली वृत्त प्रकाशित केले वास्तविक पाहता या बातमीत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या नावाचा साधा उल्लेखही नाही तरी सुद्धा पत्रकारांना संपविण्याची असंविधानिक भाषा वापरणाऱ्या आमदार कदमावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अशोक होळकर मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष अनिल देवा कुलकर्णी, जिल्हा कार्याध्यक्ष दत्तात्रय नरनाळे, जिल्हा सचिव विठ्ठल घरत, प्रदीप आनेराव, अस्लम पठाण, सिध्दांत खवतड, अंकुश पवार यांनी केली आहे.

# शेत नांगरणीचे पैसे मागितल्यावरून टॉमीने मारहाण

केज । प्रतिनिधी

शेत नांगरणीचे पैसे मागितल्यावरून एका ट्रॅक्टर चालकास तिघांनी लोखंडी टॉमीने पाठीवर व बरगडीवर मारहाण करून जखमी केल्याची घटना बेलगाव (ता. केज) येथे घडली.

बेलगाव येथील रामेश्वर महादेव चौरे या तरुणाने मागील महिन्यात मल्हारी देवीदास चौरे याच्या बटरीने केलेले ६ एकर शेत नांगरून दिले होते. १७ मे रोजी सकाळी ८.३० ते ९.३० दरम्यान शेतात जाऊन नांगरलेल्या शेताची मोजणी केल्यानंतर नांगरणीचे ९ हजार सहाशे रुपये होतात, असे सांगून या पैशाची मागणी केली. त्यावर मल्हारी चौरे हे तुझे तेवढे पैसे होत नाहीत, असे म्हणाल्यावरून त्यांच्यात बाचाबाची झाली. तेवढ्यात केशव देवीदास चौरे व रवींद्र जनार्धन चौरे या दोघांनी येऊन तु कशाचे पैसे मागत आहेस, असे म्हणत शिवीगाळ करीत दोघांनी त्यांना पकडले. मल्हारी चौरे याने लोखंडी टॉमीने रामेश्वर चौरे यांच्या पाठीवर व बरगडीवर मारहाण करून जखमी केले

# इंजिनीयरच्या हक्कासाठी एकच संघटना, महाराष्ट्रभर नवा इतिहास : संजय सरोदे

पुणे । प्रतिनिधी

पुणे येथील कार्यालयात संजय बाबा सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र बांधकाम अभियंता बैठक संपन्न झाली. आता वेळ आली आहे - एकत्र येण्याची, अन्यायाविरुद्ध लढण्याची, आणि आपले हक्क मिळवण्याची! पिंपरी-चिंचवड शहरातून संजय बाबा सरोदे यांच्या संकल्पनेतून उगम पावलेली महाराष्ट्र बांधकाम अभियंता व कामगार संघटना लवकरच अधिकृतपणे नोंदणीकृत होणार आहे.

ही संस्था केवळ एक नाव नाही, ही आहे एक क्रांती! एक अशी चळवळ जी इंजिनीयर, सुपरवायझर, ठेकेदार, श्रमिक व संपूर्ण बांधकाम क्षेत्रातील प्रत्येक घटकाचे हक्क मिळवण्यासाठी उभी राहत आहे.


संघटनेची गरज का? आज अभियंत्यांना वेळेवर मानधन मिळत नाही, जबाबदाऱ्या वाढतात पण अधिकार दिले जात नाहीत. कामगारांना सुरक्षा नाही, प्लेसमेंट नाही, आणि आवाज उठवायला व्यासपीठ नाही. या सर्व समस्यांवर एक उत्तर आहे - संघटन! संघटना काय करणार आहे? अभियंत्यांचे हक्क मिळवून देणे अपघात, जबाबदाऱ्या व वेतनावरील अन्यायाविरोधात संघर्ष रोजगार, प्लेसमेंट व लघुउद्योगासाठी मदत महाराष्ट्रभर बांधकाम क्षेत्रात आवाज उठवणारी ताकद आजच ठरवा - मी ही या परिवर्तनाचा भाग होणार! सभासद व्हा - ताकद वाढवा - हक्क मिळवा! थोड्या दिवसात रजिस्ट्रेशन पूर्ण होणार आहे. त्यानंतर ही चळवळ महाराष्ट्रभर जोराने उभी राहणार आहे. या बैठकीसाठी राज्यातून मोठ्या संख्येने महाराष्ट्र बांधकाम अभियंता उपस्थीत होते.

# ३१ मे रोजी जन्मणाऱ्या मुलींच्या नावे पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करणार

## माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दि. ३१ मे रोजी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे जन्म घेणार्या मुलींच्या भवितव्यासाठी पाच हजार रुपयांचे फिक्सडिपॉझिट करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी सोशल मिडीयाचे तालुकाध्यक्ष संदिप मडके आणि र.भ.अट्टल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्ताभाऊ पिसाळ यांनी अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या दोन वर्षांपासून या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केले आहे. दि. ३१ मे रोजी जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावाने प्रत्येकी पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे.





राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गेवराई तालुक्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी सोशल मिडीयाचे तालुकाध्यक्ष संदिप मडके आणि र.भ. अट्टल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्ताभाऊ पिसाळ यांच्या वतीने बुधवार दि. ३१ मे रोजी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावे पाच हजार रुपये शिवशारदा मल्टीस्टेट, गेवराई येथे फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. ३० मे रात्रौ १२ वाजल्या पासुन ते शनिवार दि. ३१ मे रात्रौ १२ वाजेपर्यंत या कालावधीत जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावाने पाच हजार रुपयांची मुदत ठेव विस वर्षाच्या मुदती करता ठेवण्यात येणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी हा उपक्रम राबविला असून हे तिसरे वर्ष आहे.

उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक यांना तसे लेखी कळविण्यात आले असुन उपजिल्हा रुग्णालयातील प्रमाणपत्राच्या आधारे फिक्स डिपॉझिटची पावती संबंधितांना दिली जाणार आहे. स्त्रीभृण हत्या आणि कमी झालेला मुलींचा जन्मदर या बाबी लक्षात घेता या उपक्रमाला महत्व प्राप्त झाले आहे. नेत्याचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातुन साजरा करत त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यात असल्याची माहिती संदिप मडके आणि दत्ता पिसाळ यांनी दिली.



तलवाडा : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना.छगनरावजी भुजबळ यांची सोमवारी मुंबई येथील सांताक्रूझ निवासस्थानी भेट घेऊन त्यांचा यथोचित सत्कार करताना महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष बापू गाडेकर, उपाध्यक्ष गणेश काळे, तुकाराम लाड व अशोकराव ढाकणे.

## नियुक्ती जाहीर



सोनाजी सुर्यभान वाघमारे
यांची
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
च्या अंतरवनपिंप्रि परिसर प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## नियुक्ती जाहीर



शौकत अन्वर पठाण
यांची
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
च्या दौलावडगाव तालुका आष्टी जिल्हा बीड सर्कलपदी नियुक्ती करण्यात येत आहे.


# पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला 'कृषी' चा दर्जा देण्यासाठी प्रयत्नशील : ना. पंकजा मुंडे

## पुण्यात सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटलसह विविध प्रयोगशाळेचे ना. अजित पवार व ना. पंकजा मुंडेंच्या हस्ते उद्घाटन

पुणे । प्रतिनिधी

मानवाचे व पशुंचे नाते अनादी काळापासूनचे आहे. मानवाच्या प्रगतीत पशुधनाचा वाटाही मोलाचा आहे. राज्याच्या विकासात्मक स्थित्यतरांमध्ये पशुसंवर्धनाचे योगदानही नेहमीच उल्लेखनीय राहिले आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाची प्रक्रिया अधिक व्यापक व गतिमान करण्यासाठी पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला 'कृषी'चा दर्जा प्राप्त होण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजा मुंडे यांनी केले.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत, बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भिय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा व सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल, औंध या संस्थांचे उद्घाटन उप मुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्या हस्ते व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, आ. उमा खापरे, विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशूसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे, सहआयुक्त डॉ. श्यामकांत पाटील, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेचे सहआयुक्त डॉ. याहयाखान पठाण, भारतरत्न अटल बिहारी बाजपेयी रोग अन्वेषण विभागाचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. गौरीशंकर हुलसरे आदी यावेळी उपस्थित होते.



### दूध भेसळ रोखण्यासाठी कडक कायदा - ना. पंकजा मुंडे

राज्यामध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्यांचा कार्यक्रम समुपदेशनाद्वारे पार पाडण्यात आला. विभागाच्या आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा पद्धतीचा निर्णय घेण्यात आला. या ऐतिहासिक निर्णयामुळे पशुवैद्यकाच्या शिक्षण, कौशल्य व अनुभवानुसार त्याला अपेक्षित ठिकाणी लोकसेवा बजावण्याची संधी मिळाली. त्यामुळे पशुवैद्यकीय अधिकारी वर्गात आनंद व उत्साहाचे वातावरण आहे. आता पशुरोग निदानाची कार्यवाही जलद गतीने करण्यासाठी विभागाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत, बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळा, राष्ट्रीय संदर्भिय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा व सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल, औंध या संस्थांचे कार्यान्वयन करून मोठे लक्ष्य गाठले आहे. ज्याचा सकारात्मक परिणाम पशुसंवर्धनातील व्यवसाय वृद्धीवर होणार आहे.

पर्यावरणामध्ये प्लास्टीक वापराचे दुष्परिणाम दृश्य स्वरुप घेऊ लागले आहेत. पशुधनालाही प्लास्टीकपासून मोठी बाधा निर्माण होत आहे. त्यामुळे प्लास्टीक बंदीबाबत राज्य सरकार निश्चितच कार्यवाही करेल, असा आशावाद व्यक्त करतानाच ना. पंकजा मुंडे यांनी राज्यात दूध भेसळीची समस्या अलिकडे जाणवू लागल्याचे सांगत अशा चुकीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी लवकरच कडक स्वरुपाचा दूध भेसळ प्रतिबंधक कायदा केला जाणार असल्याचे आपल्या भाषणात सांगितले.

पशुसंवर्धन विभाग पहिल्या पाच मध्ये पशुसंवर्धन विभागाने शासनाच्या १०० दिवसांच्या सुधारणा कार्यक्रमात पहिल्या पाच विभागांमध्ये मानांकन मिळवत पारदर्शक व गतिमान प्रशासनासाठी विभागाची सिद्धता अधोरेखित केली आहे. राज्य शासनाने यासाठी पशुसंवर्धन विभागाला नुकतेच गौरवान्वित केले आहे.

### पशुपालकांचे उत्पन्न वाढविणार : ना. अजित पवार

पशुसंवर्धनाच्या व्यवसायाने राज्याचे अर्थचक्र गतिमान ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आपण सर्वांनी समग्र प्रयत्न करणे आवश्यक आहे. राज्य सरकार त्यासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करण्यासाठी नेहमीच वचनबद्ध राहिल, असे आश्वासन यावेळी ना. अजित पवार यांनी देत विभागाच्या पुढीला वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# तांदळा येथील शेतकऱ्यांच्या आंदोलनाला शिवसेनेचा पाठिंबा

## शिवसेनेचे गेवराई तालुका प्रमुख उद्धव मडके यांनी आंदोलनास्थळी दिली भेट

गेवराई । प्रतिनिधी

जायकवाडी धरणातून उपकालवा करुन तो राष्ट्रीय महामार्ग क्र.-६१ च्या बाजूने करण्यात यावा, जेणेकरून शेती सिंचनाचा प्रश्न कायमचा मार्गी लावावा, यासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी गेवराई तालुक्यातील तांदळा येथे अजय पाटील साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि.२५ मे रोजी पासून आमरण उपोषण करण्यात येत आहे. दरम्यान या आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी शिवसेनेचे गेवराई तालुका प्रमुख उध्दव मडके यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. तसेच शेतकऱ्यांच्या मागण्यासंदर्भात शिवसेनेच्या वरिष्ठांना माहिती देऊन ते प्रश्न कसे मार्गी लागतील याबाबत पाठपुरावा देखील करु, असा विश्वास त्यांनी यावेळी आंदोलकांना दिला.



गेवराई तालुक्यातील दक्षिण भाग हा कायम दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. या दुष्काळी भागात दरवर्षी उन्हाळा लागताच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होती. या दुष्काळी भागात कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जायकवाडीच्या कालव्यातून उपकालवा करून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाणी द्यावे, या मागणीसाठी १४० गावातील शेतकरी मागील काही महिण्यांपासून लोकलढा सुरू आहे. दरम्यान अजय पाटील साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली तांदळा येथे रविवार दि.२५ मे रोजी पासून आमरण उपोषण सुरु केले असून त्यांनी नदी जोड प्रकल्प करून धरण, नदी, नाले, ओढे, पाटात पाणी सोडावे व ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी पाट काढण्यात यावे, त्यामुळे कायम स्वरूपी मराठवाड्यासह महाराष्ट्रील शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल, स्वामीनाथन आयोगच्या शिफारशी प्रमाणे शेतीमालाला दिडपट हमीभाव द्यावा, एक रुपयात पिक विमा हि योजना चालुच ठेवावी, गोवंश कायद्यात बदल करून कठोर अजामीन पात्र कायदा करण्यात यावा यामुळे दखलपात्र गुन्हा दाखल होईल व गो तस्कर यांना जरब बसेल, तसेच जायकवाड़ी धरणातुन राष्ट्रीय महामार्ग ६१ च्या बाजुने पाण्याचा पाट काढण्यात यावा, त्यामुळे असंख्ये गावातील पिण्याच्या व शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल, अमृतेश्वर महादेव मंदिर परिसर मौजे तांदळा शिवारातील महादेव खोरीत धरण बांधण्यात, राष्ट्रीय महामार्ग कल्याण-विशाखापट्टणम महामार्गामध्ये गेलेल्या शेतीचा आर्थिक मोबदला ज्या-त्या शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावा आदी मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येत आहे. दरम्यान आंदोलनाला शिवसेनेचे गेवराई तालुका प्रमुख उध्दव मडके यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. तसेच त्यांनी आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांसंदर्भात शिवसेनेच्या वरिष्ठांची भेट घेऊन त्या मागण्या मान्य करण्यासाठी विनंती करण्यात येईल, असे उपस्थितांना अश्वासित केले. यावेळी शिवसेनेचे शहराध्यक्ष मुकेश महाजन, विधानसभा अध्यक्ष तथा तांदळा गावचे सरपंच नवनाथ गवते, गणेश पवार यांच्यासह शिवसेनेचे कार्यकर्ते, ग्रामस्थ, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्टेअरिंगवरील ताबा सुटल्याने चारचाकी झाडावर आदळली

## मुकादमासह अन्य दोघांचा मृत्यू



आष्टी प्रतिनिधी

ऊसतोड मजुराच्या कुटुंबातील लग्न लावले, अन्य काही मजुर नव्याने पाहिले. आणि चारचाकी वाहनात बसून मुकादमासह दोघेजण गावी निघाले असता भरधाव वेगात असलेल्या चारचाकी च्या स्टेअरिंग वरील ताबा सुटल्याने चारचाकी झाडावर आदळली. यात दोघाचा जागीच तर एकाचा दुसर्या दिवशी उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी भरधाव वेगात हयगयी करत निष्काळजीपणे वाहन चालविल्या प्रकरणी मयत चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अकोले बुद्रुक येथील तानाजी संभाजी माने हा उसतोड मुकादम म्हणून काम करतो. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील काही मजुर त्याच्याकडे काम करतात. २१ रोजी एका मजुराच्या घरातील व्यक्तीचे लग्न असल्याने मुकादमासह संतोष नवले, बापू जाधव हे तिघेजण स्कॉर्पिओ क्रमांक एम.एच ४५ ए.झेड.५०७७ पाथर्डीला आले. लग्न लावले, नवीन मजुर बघून इसार देऊन ते रात्रीच्या एक ते पावणेदोनच्या दरम्यान घराच्या दिशेने पाथर्डी अहिल्यानगर हायवे रस्त्यावरून जात असताना तानाजी माने हे भरधाव वेगात वाहन चालवत असताना आष्टी तालुक्यातील मराठवाडी शिवारातील रोडच्या बाजुला असलेल्या चिंचाच्या झाडावर गाडी आदळली. यात संतोष साहेबराव नवले, बापू राजेंद्र जाधव या दोघांचा जागीच मृत्यू झाला. चालक मुकादम तानाजी संभाजी माने हा गंभीर जखमी झाला होता. दुसऱ्या दिवशी उपचारादरम्यान त्याचा देखील मृत्यू झाला. या अपघातात तिघाचा देखील मृत्यू झाल्याची घटना घडली. २४ रोजी अंभोरा पोलिस ठाण्यात रामचंद्र साहेबराव नवले याच्या फिर्यादीवरून भरधाव वेगात वाहन चालविताना निष्काळजीपणा करून दोघाच्या व स्वताच्या मृत्यूस कारणीभूत झाल्या प्रकरणी मयत चालक संभाजी माने याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आंबेडकरी विचार मोर्चाचे जिल्हा वक्फ कार्यालय समोर निदर्शने

## भू माफियांनी कब्रिस्तानची जागा सुद्धा सोडली नाही : सय्यद सलीम

बीड । प्रतिनिधी

देवस्थान इनामी जमिनीची खुलेआम अवैध प्रकारे होत असलेली खरेदी - विक्री तात्काळ थांबवा या मागणीसाठी आज जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय येथे आंबेडकरी विचार मोर्चा, आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने जोरदार निदर्शने करण्यात आली.




बीड जिल्ह्यामध्ये वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या देवस्थान इनामी जमिनीची खुलेआम खरेदी - विक्री होत असून जिल्हा वक्फ अधिकारी यांनी तातडीने पंचनामे करून अवैध खरेदी - विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर गुन्हे दाखल करावे या मागणीसाठी आज जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय येथे आंबेडकरी विचार मोर्चा, आंबेडकर रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हाध्यक्ष एड.ए.एन सय्यद यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निदर्शने करण्यात आली.बीड जिल्हामध्ये वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या जवळपास तीस हजार एकर इनामी जमीन असून त्याचा सर्वसामान्य जनतेसाठी काय वापर झाला ? जिल्ह्यातील भू माफियांनी कब्रिस्तानची जागा सुद्धा रिकामी सोडली नाही कब्रिस्तान जागेवर सुद्धा टोळेजंग इमारती बांधून अतिक्रमण केलेली आहे यावर वक्फ मंडळ कार्यालय काय करीत आहे ?. असेर आंदोलनात कार्यकर्त्यांना संबोधित करत असताना सय्यद सलीम बापू म्हणाले.

बीड जिल्ह्यातील वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या देवस्थान इनामी जमिनीची जिल्हाभरात स्थानिक नेते व भू माफिया यांच्या संगणमताने खुलेआम मोठ्या प्रमाणात खरेदी - विक्री होत आहे व त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात बोगद खालचे सुद्धा झाले असून या संदर्भात आंबेडकरी विचार मोर्चा तथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने वेळोवेळी जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय येथे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून असे एकूण बारा अर्ज जिल्हा वक्फ अधिकारी यांना देण्यात आले होते तरी वरील प्रकरणे जिल्हा व अधिकारी यांनी उदासीनता दाखवून आज पर्यंत अवैध प्रकारे होत असलेल्या खरेदी - विक्रीवर प्रकरणी कसलीही कार्यवाही केली नसल्याने हे सर्व प्रकार जिल्हा वक्फ अधिकारी यांच्या संगनमताने होत असल्याचे दिसत आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग न करता त्यांनी आपला मनमानी कारभार थांबवावा. जिल्ह्यातील वक्फ मंडन कार्यालय अंतर्गत १९६० ते २०२५ पर्यंत देवस्थान इनामी जमिनीचे एकूण किती खालसे झालेले आहेत व त्याचप्रमाणे बीड जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत किती इनामी जमीन खिदमत माशा आहे व किती इनामी जमीन मदत माश आहे व मंडळ अंतर्गत येणाऱ्या किती जमिनीची विरासत झालेली आहे, किती जमिनीची विरासत झालेली नाही व किती जमिनींची अजून बाकी आहे, किती जमिनी वादग्रस्त आहे व किती जमिनींचे कोर्टात स्टे ऑर्डर आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी व त्याचप्रमाणे ज्या जमिनींची विराच झाली नाही त्या जमिनी तातडीने लावणी काढण्यात यावी.

तरी जिल्हा वक्फ अधिकारी यांनी अवैध प्रकारे खरेदी - विक्री प्रकरणी तातडीने पंचनामे करून वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे अवैध प्रकारे खरेदी - विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर गुन्हे दाखल करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी सय्यद सज्जाद पट्टेदार, शेख इलियास, काशिनाथ आरगडे, समीर सिद्दिकी, किशोर डोंगरे, इमरान शेख, सय्यद दस्तगीर सह आंबेडकरी विचार मोर्चाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी तालुक्यात शेरी गावाजवळील नगर-बीड महामार्गावरील पर्यायी पूल मुसळधार पावसामुळे गेला वाहून

## संबंधित कॉन्ट्रकदार यांना काळ्या यादीत टाका : नितीन सोनवणे



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात (आष्टी तालुका, बीड जिल्हा) हे नगर-बीड महामार्गावरील एक महत्त्वाचे ठिकाण आहे. हा महामार्ग बीड जिल्ह्याला अहमदनगर आणि इतर भागांशी जोडणारा प्रमुख रस्ता आहे. पर्यायी पूल हा सहसा तात्पुरता किंवा कमी खर्चाचा पूल असतो, जो मुख्य पूल दुरुस्ती किंवा बांधकामादरम्यान वाहतुकीसाठी वापरला जातो. अशा पुलांचे बांधकाम जलद गतीने केले जाते, परंतु त्याची टिकाऊपणा आणि मजबुती याबाबत प्रश्न उपस्थित होऊ शकतात. मुसळधार पाऊस: बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका हा अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडतो, परंतु काही वेळा मुसळधार पावसामुळे नद्या, नाले आणि ओढ्यांना पूर येतो. यामुळे पर्यायी पूल वाहून जाण्याची शक्यता असते, विशेषत: जर पूलाचा पाया किंवा संरचना कमकुवत असेल.

पर्यायी पूल बांधताना कंत्राटदाराने भौगोलिक आणि हवामानविषयक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी भागात पावसाचे प्रमाण कमी असले तरी, मुसळधार पावसाच्या शक्यतेचा अंदाज घेऊन पूलाची रचना करणे काळजी गरज होती, पूलाच्या संरचनेत पुराचे पाणी आणि दाब सहन करण्याची क्षमता नसेल, तर हे कंत्राटदाराच्या निष्काळजीपणाचे हे लक्षण आहे.

पर्यायी पूल हा तात्पुरता असला तरी, त्याची रचना स्थानिक नद्या किंवा ओढ्यांच्या पाण्याच्या प्रवाहाचा विचार करून तयार करणे गरजेचे आहे. पूल बांधल्यानंतर त्याची नियमित तपासणी आणि देखरेख ही कंत्राटदाराची जबाबदारी असते, विशेषत: पावसाळ्यात. जर कंत्राटदाराने ही जबाबदारी पार पाडली नाही म्हणून पूल वाहून जाण्यास ते कारणीभूत आहेत. तसेच, पूल वाहून जाण्यापूर्वी जर त्यात कमकुवतपणा दिसून आला असेल आणि त्याची दुरुस्ती केली गेली नसेल, तर हा कंत्राटदाराचा निष्काळजीपणा आहे.


कंत्राटदार आणि सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा संबंधित प्राधिकरण यांच्यातील करारात बांधकामाची गुणवत्ता, टिकाऊपणा आणि देखरेख याबाबत स्पष्ट अटी असतात. जर कंत्राटदाराने या अटींचे पालन केले नसेल, तर ते कायदेशीररित्या जबाबदार आहेत. वाहतूक व्यवस्थेसाठी पर्यायी मार्ग किंवा तात्पुरता पूल त्वरित उभारणे अशी आमची मागणी आहे.

नगर-बीड महामार्गावरील शेरी येथील पर्यायी पूल मुसळधार पावसाने वाहून गेला, तर याला प्रामुख्याने कंत्राटदार जबाबदार आहे, जर त्याने बांधकामात निकृष्ट साहित्य वापरले असेल, डिझाईनमध्ये त्रुटी ठेवल्या असतील, किंवा स्थानिक भौगोलिक आणि हवामान परिस्थितीचा विचार केला नसेल. तथापि, प्रशासनाच्या अपुऱ्या पर्यवेक्षणामुळेही ही समस्या उद्भवू शकते. याबाबत तपास समिती स्थापन करून कंत्राटदार आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासनाने एकत्रितपणे पुढील उपाययोजना कराव्यात, जेणेकरून भविष्यात अशा घटना टाळता येतील, अशी ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी आहे.

# शिरापूरकर यांच्या एकतर्फी निकालांवर संशय; जनहित याचिका दाखल करणार : जगदाळे

धाराशिव । प्रतिनिधी

धाराशिव येथे जिल्हा उपनिबंधक पदावर कार्यरत असताना शिरापूरकर यांनी अनेक प्रकरणांमध्ये एकतर्फी व नियमबाह्य निर्णय दिल्याचा आरोप होत असून, या निकालांमागे आर्थिक व्यवहार असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन मनसेच्या राज्य उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांनी त्यांच्या विरोधात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा दिला आहे.



धाराशिवमधील नागरिकांनी सातत्याने शिरापूरकर यांच्या निकालांबाबत तक्रारी केल्या असून, अर्जदार व गैर अर्जदार या दोघांकडूनही आर्थिक देवाणघेवाण झाल्याचे आरोप आहेत. या पार्श्वभूमीवर वर्षाताई जगदाळे यांनी लातूर जिल्हा निबंधकपदी कार्यरत असलेल्या सुनील शिरापूरकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. त्यांनी सांगितले की, एक-दोन चुका होऊ शकतात तुम्ही समजू शकता, परंतु येथे अनेक प्रकरणांत नियमबाह्य निर्णय दिले गेले असून भ्रष्टाचार झाला आहे. वर्ष २०२३-२४ दरम्यान धाराशिव येथे कार्यरत असताना शिरापूरकर यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागल्याचेही त्या म्हणाल्या. एवढे गंभीर आरोप असूनही त्यांची लातूर येथे जिल्हा निबंधक म्हणून बढती झाल्यामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या भूमिकेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

यासंदर्भात वर्षाताईंनी सांगितले की, शिरापूरकर यांच्या संपूर्ण संपत्तीची चौकशी झाली पाहिजे. तसेच त्यांच्या कार्यकाळातील सर्व निर्णयांची पुन्हा तपासणी व्हावी. दोषी आढळल्यास त्यांच्यावर निलंबनासह गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र अद्याप प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही.यामुळे मनसेच्या वतीने लातूर जिल्हा निबंध कार्यालयात आंदोलन करण्याचा इशाराही वर्षाताई जगदाळे यांनी दिला आहे.

# शिवसैनिकांनो, तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल : ना.शिरसाट

## मंत्री ना. संजयजी शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षात कधी जात पाहून काम केलं जात नाही व शिवसैनिक कधीच जात धर्म बघून जनतेचा कामासाठी पुढे जात नाहीत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांचे संस्कार आपल्यावर झालेले आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे साहेब यांची स्वाभिमानी विचारधारा घेऊन आपण सर्व शिवसैनिक पुढे वाटचाल करत आहोत. त्यामुळे शिवसैनिकांनी जात-धर्म न बघता केवळ माणूस बघून सर्व सामान्य जनतेचे काम करा, जनतेच्या मनावर तुम्ही अधिराज्य गाजवाल आणि जनता तुम्हाला डोक्यावर घेऊन मिरवेल. तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल. असे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते संजयजी शिरसाट साहेब यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या आढावा बैठकीमध्ये शिवसैनिकांना संबोधित केले. तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत दिशा स्पष्ट केली.

काल दि.२४ रोजी दुपारी २.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. श्री. संजयजी शिरसाठ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेनेची अत्यंत महत्वपूर्ण आढावा बैठक मोठया उत्साहात संपन्न झाली. ही बैठक म्हणजे बीड जिल्ह्यात शिवसेना संघटनेच्या मजबुतीचा ठोस पुरावा ठरली. या बैठकीमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी मंत्री महोदय ना. शिरसाट साहेबांचे बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जंगी स्वागत करत मोठ्या थाटामाटात सत्कार केला. यानंतर मंत्री ना. शिरसाट साहेबांनी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना संबोधित केले. तसेच या बैठकीसाठी उपस्थित असणारे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब आणि शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत मार्गदर्शन केले. बैठकीचे प्रास्ताविक नवनिर्वाचित शिवसेना तालुकाप्रमुख संतोष जाधव यांनी केले तर बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आपल्या भाषानातून जिल्ह्याचा आढावा मांडला.



दरम्यान बैठकीत मंत्री महोदय ना. शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या महिला आघाडी अध्यक्षा जयश्रीताई वाघमारे व बाळासाहेब खेडकर तंटामुक्ती अध्यक्ष खामगाव गेवराई यांनी मंत्री महोदय शिरसाट यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहिर, महिला आघाडीच्या सह संपर्कप्रमुख अलकाताई डावकर, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, युवा सेनेचे गणेश शिराळे, ओबीसी वी जयंती सेनेचे जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आढावा बैठकीचे सूत्रसंचलन प्रतिक कांबळे यांनी केले.

### शिवसेना नवनियुक्त पदाधिकारी

अमोल दिगंबर जाधव - शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड ग्रामीण, संतोष किसनराव जाधव - शिवसेना तालुकाप्रमुख बीड तालुका, ज्ञानोबा जनार्धन गोंडे - शिवसेना तालुकाप्रमुख वडवणी तालुका, गजानन दामोदर कदम - शिवसेना शहरप्रमुख बीड शहर, हनुमंत काशिनाथ शिंदे - शिवसेना शहरप्रमुख वडवणी शहर, सुनील अंकुशराव गवते - जिल्हा सहसंघटकपबीड विधानसभा, केशव बाबुराव घिघे - जिल्हा सहसंघटक माजलगाव विधानसभा. नारायण आप्पासाहेब शिंदे-शिवसेना उपजिल्हाप्रमुख गेवराई, उध्दव ज्ञानेश्वर मडके - शिवसेना तालुकाप्रमुख गेवराई, नवनाथ राजेंद्र गवते - शिवसेना विधानसभा प्रमुख गेवराई, मुकेश अंकुशराव महाजन - शिवसेना शहरप्रमुख गेवराई, सुनिल मोटे - शिवसेना शहरसंघटक गेवराई या सर्व नवनिर्वाचित शिवसेना पदाधिकाऱ्यांना मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्रक देण्यात आले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT